॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी) :कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या प्रवेशांची संख्या व मागणी लक्षात घेता २०० विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ निधीतून नवीन वसतिगृह बांधण्याचा निर्णय कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दि. २६ मे,२०२६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत घेण्यात आला. या वसतिगृहाच्या बांधकामासाठी अंदाजित २३ कोटी निधी अपेक्षीत आहे.

विद्यापीठातील विद्यापीठात २०० क्षमतेचे वसतिगृह निर्माण करण्याचा प्रस्तावाबाबत व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत चर्चा झाली. विद्यापीठात जळगाव, धुळे व नंदुरबार या तीनही जिल्हयातील आदिवासी व ग्रामिण भागातील विद्यार्थी  शिक्षण घेत असतात. त्यांना निवासाची सोय सद्यस्थितीत असलेल्या तीनही वसतिगृहामधून पूर्ण होवू शकत नाही.  त्याकरीता विद्यापीठ निधीतून लागणाऱ्या खर्चास हातभार लावण्यासाठी जनसहभागाचा देखील यात सहभाग असावा असा निर्णय घेण्यात आला. त्याकरीता व्यवस्थापन परिषद सदस्य नंदकुमार बेंडाळे, नितीन झाल्टे व ॲड अमोल पाटील यांनी प्रत्येकी एक लाख रूपयांची देणगी जाहीर केली. जनसहभागातून  अर्थसहाय्य घेतांना व्यवस्थापन परिषद सदस्यांनी पुढाकार घेत किमान २५ हजार रक्कम देण्याची सहमती दर्शवली. ज्या दानशूर व्यक्तींना त्यांच्या नावाचा उल्लेख करावयाचा असेल त्याकरीता पुढील कामाकरीता देणगी रक्कमा निश्चित करण्यात आल्यात. अद्ययावत स्वयंपाकघर व भोजनगृहा करीता एक कोटी, निवासी १ ते ४ मजले करीता प्रती मजला एक कोटी, नवसंशोधन व संगणक प्रयोगशाळे करीता ५० लाख, २४ तास सुविधा असलेले ग्रंथालय व अभ्यासिका करीता ५० लाख, सामायिक विश्रामकक्ष व अंतर्गत जिमखाना २५ लाख, एका निवास खोलीकरीता ५ लाख व एक लाखापेक्षा अधिक देणगी देणाऱ्यांसाठी 'वॉल ऑफ ऑनर्स' ची निर्मिती करण्यात येणार आहे. वरील देणगीदारांची नावे त्या त्या ठिकाणी दर्शविली जाणार आहेत. या वसतिगृहासाठी देणगी देणाऱ्यांना आयकर कलम ८०जी अंतर्गत सवलत मिळेल. विविध उद्योजक यांनी सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) म्हणून अधिकाधिक देणगी द्यावी. तसेच समाजातून देखील दानशूर व्यक्तींनी या कार्यासाठी पुढाकार घ्यावा व मदत करावी असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २७ मे, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता